नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७ Issue - 7 | वार शनिवार दि. २४ मे २०२५ Blow- Saturday Date 24 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अरबी समुद्रात कमी दाबाचं क्षेत्र; महाराष्ट्रावर पावसाचं सावट

## राज्यात मान्सूनचं आगमन लवकर; कोकणात पुढील २४ तासात अतिमुसळधार पाऊस बरसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावली आहे. अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी शेतीचं नुकसान झालं आहे. तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचं देखील बघायला मिळालं. राज्यात सर्वदूर पाऊस पडताना दिसतोय. या दरम्यान आता अरबी समुद्रत कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झालं आहे. अर्थात त्याचा महाराष्ट्राला जास्त फटका बसण्याची शक्यता कमी आहे. पण महाराष्ट्राव पावसाचं सावट कायम आहे.

दक्षिण कोकण किनाऱ्याच्या सागरकिनाऱ्यालगतच्या पूर्व-मध्य अरबी समुद्रातील कमी दाबाचा परिसर सध्या देखील त्या भागात कायम आहे. तो पुढील २४ तासांत उत्तरेच्या दिशेने हालचाल करून अधिक तीव्र खोल जाण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागाने सांगितलं आहे. यामुळे महाराष्ट्रावर देखील पावसाचं सावट आहे. विशेष म्हणजे कोकण किनारपट्टीवर पाऊस पडण्याची शक्यता आहे.


हवामान विभागाचे तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनी शुक्रवारी रात्री पावसाबाबत महत्त्वाची माहिती दिली. २३ मे, सायंकाळी ७.३० वाजता घेतलेल्या नवीन उपग्रह निरीक्षणानुसार, दक्षिण-कोकण किनाऱ्याच्या बाहेर घनदाट ढगांची पट्टी दिसून येत आहे. तर काही ठिकाणी मध्यम तीव्रतेचे ढग किनाऱ्याजवळ आढळत आहेत, असं त्यांनी सांगितलं आहे.

पालघर जवळ एक वेगळी ढगांची पट्टीही दिसत आहे. पण मुंबई आणि ठाणे सध्या तरी ढगमुक्त दिसत आहेत. पुन्हा लक्ष ठेवूया. कृपया खचऊच्या इशाऱ्यांकडे लक्ष द्या, अशी माहिती के. एस. होसाळीकर यांनी दिली आहे.

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे कोकण किनारपट्टीला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर रायगड आणि रत्नागिरीला रेड अलर्ट देण्यात आला आहे.

मेघगर्जनेसर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे मच्छिमारांनाही काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे पुढच्या दोन ते चार दिवसांत महाराष्ट्रासह गुजरात किनारपट्टीवर जावू नये, असं आवाहन करण्यात आलं आहे.

दरवर्षी पावसाची वाट पाहवी लागते. पण यावर्षी मान्सूनचं आगमन लवकर होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे अंदमान निकोबार येथे मान्सून दाखल झाला आहे.



केरळमध्ये पुढच्या आठ दिवसांत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुढच्या आठ दिवसांनी महाराष्ट्रात मान्सून दाखल होतो. यामुळे ५ जूनपर्यंत राज्यात मान्सूनचं आगमन होण्याची शक्यता आहे.

# वैष्णवीचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात, लवकर निकाल, अजित पवारांचा कस्पटेंना शब्द



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वैष्णवी हगवणे (तरळीह-परींळ हरसुरपश) हिच्या लग्नात ज्यांच्या हाताने हगवणे कुटुंबीयांना फॉर्च्युनरची चावी देण्यात आली होती त्या अजित पवारांनी वैष्णवीच्या माहेर जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. वैष्णवीच्या वडिलांसोबत फोन-वरुन संवाद साधल्यानंतर अजित पवारांनी आज त्यांच्या घरी जाऊन आई-वडिलांची भेट घेत संपूर्ण घटना जाणून घेतली. यावेळी, मोठा पोलीस बंदोबस्त कस्पटे कुटुंबीयांच्या घराबाहेर दिसून आला. पीडित कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधत भूमिका व तपासाबाबत माहिती दिली. तसेच, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल, याचा लवकर निकाल लागेल असेही अजित पवारांनी सांगितले. तर, वैष्णवीचे मामासासरे असलेल्या पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनाही अजित पवारांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे.

वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात फरार आरोपी राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा शशांक हगवणे यांस पोलिसांनी आज पहाटेच्या सुमारास अटक केली. या अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर केले असता, २८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दुसरीकडे राजकीय वर्तुळातही या घटनेवरुन संताप व्यक्त होत असून भाजपच्या महिलांनी कोर्टाबाहेर आंदोलन करत, आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. आज सकाळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी कस्पटे कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वैष्णवीच्या आई-वडिलांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यानंतर, माध्यमांशी संवाद साधताना, याप्रकरणी कोणाचीही हयगय केली जाणार नाही, राजकीय हस्तक्षेप होणार नाही असे अजित पवारांनी म्हटले.

घटनेची माहिती मिळताच, मी पिंपरी चिंचवडचे आयुक्त चोबे यांना आदेश दिले होते. कोणाची हयगय करायची नाही, राजकीय हस्तक्षेप होणार नाही. आरोपींना तातडीनं बेड्या ठोकण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, तिघांना आधीचं अटक केली होती, सासरे आणि दिराला आज बेड्या ठोकल्या आहेत. मग मी कस्पटे कुटुंबीयांशी वैयक्तिक बोललो. तपास करणाऱ्या सर्वांना इथंच बोलावलं. तसेच, बाळ ज्यांच्याकडे होते त्या निलेश चव्हाणवर ही कडक कारवाईचे आदेश दिले आहेत, अशी माहिती अजित पवारांनी दिली. आरोपी फोन आणि गाडी वारंवार बदलत होता, मात्र पोलिसांनी जुळवाजुळव करुन चांगली कारवाई केली. आता न्यायालयात ही त्यांना कठोर शिक्षा होईल, त्याअनुषंगाने पावलं उचलायला सांगिले आहेत. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल, तातडीनं निकाल लागेल. कारण, ही अतिशय वेदनादायक घटना आहे, असेही अजित पवारांनी स्पष्ट केले.पुणे सीपी अंडर येणाऱ्या एरियातील निलेश चव्हाणकडे बंदूक आहे, त्यालाही कठोर कारवाईचे आदेश पुण्याच्या सीपींना दिले आहेत. त्यानेही घटस्फोट दिल्याचं समजलं आहे, दुसरीकडे मोठी सून मयुरीचा ही छळ केल्याचं समोर आलंय. या सर्वांच्या अनुषंगाने केस स्ट्राँग केली जाईल, असेही पवार म्हणाले.

तुमच्या-माझ्या घरातील केस असते तर चव्हाट्यावर ही केस आणली नसती. तपास योग्य सुरुये, असं कस्पटे कुटुंब म्हणाले. प्रत्येक गोष्टीची शहानिशा केली जाईल. पत्रकारांना वकीलापेक्षा जास्त ज्ञान आहे, हत्येचा गुन्हा दाखल केला आणि पुरावे नसतील तर केस स्ट्राँग राहणार नाही. त्यामुळे पुराव्यांच्या आधारे हे प्रकरण हाताळले जातंय. शेवटी न्यायालयात प्रकरण टिकायला हवं. जालिंदर सुपेकर यांच्याशी मी बोललो. त्यांना सांगितलं प्रकरण संवेदनशील आहे, तुमच्याबाबत दबक्या आवाजात बोललं जातं. पण, तपासात फोनचे कनेक्शन आढळलं तर कारवाई केली जाईल, असेही अजित पवारांनी सांगितलं.

# पाकिस्तान नरमलं! सिंधू पाणी प्रश्न सोडवा नाहीतर आपण उपासमारीने मरु

नवी दिल्ली : जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिलला दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्लयात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पावले उचलली होती. भारताने सिंधू जल करार रद्द केला होता. भारताने सिंधू पाणी करार पुढे ढकलल्यानंतर पाकिस्तान नाराज आहे. अलिकडेच पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी यांनी भारताला रक्तपाताची धमकी दिली होती. परंतू, आता पाकिस्तानचा दृष्टिकोन बदलत आहे. या संदर्भात, पाकिस्तानी खासदार सय्यद अली जफर यांनी आता याला वॉटर बॉम्ब म्हटले आहे. जर आपण हा पाण्याचा प्रश्न सोडवला नाही तर आपण उपासमारीने मरु शकतो. कारण सिंधू खोरे ही आपली जीवनरेखा असल्याचे खासदार सय्यद अली जफर म्हणाले.



**पाकिस्तानी संसदेत सिंधू पाणी कराराबाबत चर्चा**

पाकिस्तानी संसदेत सिंधू पाणी कराराबाबत चर्चा झाली. यानंतर खासदार सय्यद अली जफर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पाण्याचा प्रश्न पाकिस्तानसाठी दहशतवादाच्या मुद्द्याइतकाच महत्त्वाचा आहे. हे देखील आपल्यावर लादलेले युद्ध आहे. २१ व्या शतकातील युद्धे ही पाण्यावरुन लढली जातील, हे सिद्ध होत असल्याचे जफर म्हणाले.

जर आपण हा पाण्याचा प्रश्न सोडवला नाही तर आपण उपासमारीने मरू शकतो असे जफर म्हणाले. पाकिस्तानमध्ये आधिच पाण्याची टंटाई आहे. या बाबतीत जगात तो सर्वोच्च क्रमांकावर आहे. आज देश वेगाने पाणीटंचाईकडे वाटचाल करत आहे. याची दोन कारणे आहेत, पहिले हवामान बदल आणि दुसरे लोकसंख्या. त्यामुळं हा मुद्दा देखील दहशतवाद्यांइतकाच महत्त्वाचा असल्याचे जफर म्हणाले.

पाकिस्तानी खासदार जफर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जर आपण हा पाण्याचा प्रश्न सोडवला नाही तर आपण उपासमारीने मरु शकतो. याचे कारण म्हणजे सिंधू खोरे ही आपली जीवनरेखा आहे. तीन चतुर्थांश पाणी बाहेरुन येते. १० पैकी ९ लोक सिंधू जल खोऱ्याच्या मदतीने आपले जीवन जगत आहेत. ९० टक्के पिके या पाण्यावर अवलंबून असल्याचे जफर म्हणाले. आमच्यावर एक पाण्याचा बॉम्ब पडला आहे, जो आपल्याला निकामी करायचा आहे असेही जफर म्हणाले.

पाकिस्तानमधील सर्व वीज प्रकल्प आणि धरणे याच पाण्यावर बांधली आहेत. त्यामुळं पाकिस्तानवर पडलेला हा पाण्याचा बॉम्ब आहे. जो आपल्याला निकामी करायचा आहे. पाकिस्तानमध्ये पाणी भारतातून वरपासून खालपर्यंत येते. जेव्हा पाकिस्तानची स्थापना झाली तेव्हा भारताने एक गोष्ट ठरवली की, आपण पाकिस्तानला पाण्याद्वारे उत्तर द्यायचे.

# भारतात तयार झालेले आयफोन अमेरिकेत विकलेत तर...; ट्रम्प यांची धमकी

नवी दिल्ली: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा टॅरिफची धमकी दिली आहे. पलनं अमेरिकेत विकले जाणारे आयफोन इथेच तयार करावेत, यासाठी ट्रम्प आग्रही आहेत. भारत किंवा अन्य देशात तयार झालेले आयफोन अमेरिकेत विकल्यास त्यावर २५ टक्के टॅरिक लावण्याची धमकी ट्रम्प यांनी पल कंपनीला दिली आहे. या प्रकरणी पलनं कोणतंही पाऊल उचलल्यास त्याचे भारतावर परिणाम होऊ शकतात.

ट्रम्प यांनी ट्रूथ सोशलवर एक पोस्ट लिहिली आहे. 'अमेरिकेत विकले जाणारे आयफोन भारतात किंवा अन्य कोणत्या देशात तयार झालेले नसावे. त्यांची निर्मिती भारतातच झालेली असावी असं मी पलच्या टिम कुक यांना आधीच सांगितलेलं आहे. तसं न झाल्यास पलला कमीतकमी २५ टक्के टॅरिफ द्यावं लागेल,' असा थेट इशारा ट्रम्प यांनी दिलेला आहे. पल भारतातील उत्पादनात वाढ करणार असल्याच्या बातम्या येत असताना ट्रम्प यांनी कंपनीला



थेट धमकी दिलेली आहे.

पलनं अधिकाधिक उत्पादनं अमेरिकेत करावं अशी ट्रम्प यांची इच्छा आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी याबद्दल टिम कुक यांना जाहीरपणे सांगितलं होतं. पण त्याकडे दुर्लक्ष करत पलनं भारतातील आपलं उत्पादन वाढवण्याचा निर्णय घेतला. चीन आणि व्हिएतनामसारख्या प्रमुख उत्पादन हब असलेल्या देशांसोबत अमेरिकेचं व्यापार युद्ध सुरु आहे. त्यामुळे आता पलच्या नजरा भारताकडे लागलेल्या आहेत.

अमेरिकेत विकले जाणारे सगळेच्या सगळे आयफोन पुढील वर्षापर्यंत भारतातच तयार व्हावेत, असे प्रयत्न पलकडून सुरु आहेत. तसं झाल्यास पलला होणारा आर्थिक फायदा मोठा आहे. त्यामुळेच ट्रम्प यांच्या विधानानंतरही पलनं भारतावरील लक्ष कायम ठेवलं आहे. भारतामधील कंपनीच्या गुंतवणूक योजना कायम राहणार असल्याचं आश्वासन पलच्या अधिकाऱ्यांनी भारत सरकारमधील अधिकाऱ्यांना दिलं आहे.

**मराठी भाषेचे जतन, प्रचार, प्रसार आणि संवर्धन झाले पाहिजे** — **मराठी भाषा मंत्री उदय सामंत**

# जागतिक पातळीवर मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यास राज्यशासन प्रयत्नशील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : मराठी भाषेचे जतन, संवर्धन करुन पुढच्या पिढीला देखील मराठी भाषेचे ज्ञान उपलब्ध झाले पाहिजे, याकरीता प्रत्येक मराठी भाषिकाला अभिमान वाटेल अशाप्रकारे जागतिक पातळीवर मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याकरिता राज्यशासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले.

मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या व्यक्ती, संस्थेला राज्य शासनाच्यावतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

गुजर-निंबाळकरवाडी येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्यान भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सरहद संस्थेचे संजय नहार, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्यासह संजय पगारिया, अनुज नहार, यशपाल जवळगे तसेच साहित्यप्रेमी उपस्थित होते.

श्री. सामंत म्हणाले, दिल्ली येथील अखिल भारतीय साहित्य





संमेलनात अनेक सकारात्मक गोष्टी घडल्या. सांस्कृतिक, साहित्याची ऊर्जा मिळाली. सरहद संस्थेमार्फत समाजउपयोगी संकल्पना आखून त्या यशस्वीरित्या पार पाडण्याचे काम करण्यात येत आहे. त्यातून समाजाला नवीन दिशा मिळाली आहे. सरहद संस्थेचे संजय नहार यांच्या संकल्पनेतून हे उद्यान साकारत आहेत.

साहित्याच्या क्षेत्रात काम करणारे दर्दी लोक आज अतिशय उत्तम पद्धतीने देशातील पहिले साहित्याचे दालन खुले करीत आहेत. मराठी भाषेच जतन, प्रचार, प्रसार आणि संवर्धन झाले पाहिजे. अशा अनेक गोष्टी अशा कार्यक्रमातून साकार होतात म्हणून असे कार्यक्रम झाले पाहिजेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. यामध्ये ७५० वर्षांपूर्वीच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा सिंहाचा वाटा आहे. या ग्रंथाचा संदर्भ घेऊनच हा दर्जा बहाल केला गेला याचा आम्हाला अभिमान आहे. आळंदी देवस्थानच्यावतीने ज्ञानेश्वरी ग्रंथ छपाईकरिता करण्यात आलेल्या मागणीप्रमाणे १ कोटी रुपयांचा निधी ४८ तासाच्या आत तत्काळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. मराठी भाषेचे इंग्रजी भाषेला पर्यायी शब्द निर्माण करण्यासाठी मोहीम हाती घ्यावी, असे आवाहनही श्री. सामंत यांनी केले. श्री. नहार म्हणाले, साहित्य संमेलन हा एक कार्यक्रम न राहता लोकसहभागाच्या माध्यमातून साहित्याच्या प्रचार आणि प्रसाराची चळवळ झाली पाहिजे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अनेक मोठमोठे अध्यक्ष, स्वागताध्यक्ष होऊन गेले आहेत. त्यांची ओळख पुढच्या पिढ्यांना झाली पाहिजे ही भावना हे उद्यान उभे करण्यामागे आहे, असेही ते म्हणाले.

## संपादकीय....

### पावसाचं सावट

दरवर्षी पावसाची वाट पाहवी लागते. पण यावर्षी मान्सूनचं आगमन लवकर होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे अंदमान निकोबार येथे मान्सून दाखल झाला आहे. केरळमध्ये पुढच्या आठ दिवसांत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुढच्या आठ दिवसांनी महाराष्ट्रात मान्सून दाखल होतो. यामुळे ५ जूनपर्यंत राज्यात मान्सूनचं आगमन होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावली आहे. अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी शेतीचं नुकसान झालं आहे. तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचं देखील बघायला मिळालं. राज्यात सर्वदूर पाऊस पडताना दिसतोय. या दरम्यान आता अरबी समुद्रत कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झालं आहे. अर्थात त्याचा महाराष्ट्राला जास्त फटका बसण्याची शक्यता कमी आहे. पण महाराष्ट्राव पावसाचं सावट कायम आहे. दक्षिण कोकण किनाऱ्याच्या सागरकिनाऱ्यालगतच्या पूर्व-मध्य अरबी समुद्रातील कमी दाबाचा परिसर सध्या देखील त्या भागात कायम आहे. तो पुढील २४ तासांत उत्तरेच्या दिशेने हालचाल करून अधिक तीव्र खोल जाण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागाने सांगितलं आहे. यामुळे महाराष्ट्रावर देखील पावसाचं सावट आहे. विशेष म्हणजे कोकण किनारपट्टीवर पाऊस पडण्याची शक्यता आहे. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे कोकण किनारपट्टीला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान

## महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे; हुंडा, बालविवाह प्रथांचे कायमस्वरूपी निर्मुलन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी व सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने सन २०२५-२६ पासून राज्यात 'आदिशक्ती अभियान' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे महिलांसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजना, उपक्रम, कार्यकम आदींबाबत आवश्यक व उपयुक्त माध्यमांद्वारे प्रचार व प्रसिद्धी देऊन जनजागृती करण्यात येईल. यासाठी ग्रामस्तरीय समित्यांना 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरविण्यात येईल, अशी माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

हे अभियान राज्यभर राबविण्यासाठी ग्रामस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर विशेष समित्यांचे गठन करण्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने या अभियानात सहभाग घेणे अनिवार्य असून, १५



दिवसांच्या आत राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायत स्तरावर विशेष ग्रामसभा घेऊन ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही मंत्री तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले.

राज्यातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६० टक्के लोकसंख्या महिला व बालके आहेत. शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व महिलाभिमुख योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकातील महिलांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे व जनजागृतीच्या माध्यमातून चळवळ निर्माण करणे, अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपायोजना करणे तसेच महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने हे अभियान राबविण्यात येत आहे. तसेच आदिशक्ती अभियान उत्कृष्टपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार असल्याची माहितीही मंत्री तटकरे यांनी दिली.

तालुकास्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या समित्यांना प्रथम पुरस्कार एक लाख, द्वितीय पुरस्कार ५० हजार, तर तृतीय पुरस्कार २५ हजार रूपये देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार पाच लाख, द्वितीय पुरस्कार तीन लाख तर, तृतीय पुरस्कार एक लाखाची रक्कम प्रदान करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार १० लाख, द्वितीय पुरस्कार सात लाख तर, तृतीय पाच लाखाची रक्कम प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

या अभियाना अंतर्गत महिला विकास विषयक कार्ये म्हणजेच बालविवाह रोखणे, हुंडा पद्धती बंद करणे, महिला संरक्षण, गावातील एकल महिला, विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच, महिला सक्षमीकरण विषयक कार्ये अंतर्गत महिला बचत गटांची निर्मिती व सक्षमीकरणासाठी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मदतीने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करण्यात येणार आहे. तसेच जाणीव जागृती कार्यक्रमांतर्गत कायदे, योजना व त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा व सुविधा याबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणे अंतर्गत आरोग्य, शिक्षण व संरक्षणाशी संबंधित असणाऱ्या समित्यांना बाल संरक्षण समिती, महिला आरोग्य व पोषण समिती, महात्मा गांधी तंटा मुक्त ग्राम समित्ती शालेय व्यवस्थापन संदर्भात काम करण्यात येईल. सामाजिक सुरक्षितते करीता कार्यक्रम अंतर्गत अंध, अपंग, विकलांग यांना शासनाच्या योजनांमध्ये प्राधान्य देऊन योजना लागू करण्यात येईल. आरोग्य विषयक कार्यक्रमांतर्गत आशा स्वयंसेविका / आरोग्य सेविका समुदाय आरोग्य अधिकारी (उकज) यांच्या मदतीने गाव पातळीवर आरोग्य तपासणी करण्यात येईल. शिक्षण विषयक कार्यक्रमात किशोरवयीन मुली नियमितपणे शाळेत जातील व त्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडणार नाही याची दक्षता समिती घेईल.

पर्यावरण विषयक कार्यक्रमात ग्राम पंचायत कार्यक्षेत्रातील खुल्या सार्वजनिक जागेवर ग्रामपंचायतीच्यावतीने नव्याने वृक्ष लागवड करण्याचा प्रयत्न करावा व केलेल्या वृक्ष लागवडीची सातत्याने जोपासना करावी इत्यादी संबंधित कार्ये करण्यात येतील.

# आपत्ती काळात संपर्कासाठी राज्य, जिल्हा, महापालिका नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीमध्ये संपूर्ण राज्यभरातील आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्सून पूर्व तयारी आढावा बैठकीत दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तत्काळ संपर्कासाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र मंत्रालय मुंबई, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, महानगरपालिका नियंत्रण कक्ष आणि रेल्वे नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक सतीशकुमार खडके यांनी जाहीर केले आहेत.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र मंत्रालय, मुंबई

आपत्ती व्यवस्थापन केंद्र - ९३२१५८७१४३, दूरध्वनी: ०२२- २२०२२७९९०, ०२२-२२७९४२२९, ०२२- २२०२३०३९, आपत्कालीन संपर्क - १०७०

ई-मेल लेपींश्रीाारहरीरिहींर.सीं.ळप

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक :-

मुंबई शहर- ०२२-२२६६४२३२, मुंबई उपनगर- ०२२-६९४०३३४४, ठाणे - ०२२-२५३०१७४० /९३७२३३८८२७, पालघर - ०२५२५-२९७४७४/ ०२५२५-२५२०२०, रायगड - ०२१४१-२२२०९७, रत्नागिरी - ०२३५२-२२२२३३ / २२६२४८, सिंधुदुर्ग- ०२३६२-२२८८४७, नाशिक - ०२५३-२३१७१५१, अहिल्यानगर - ०२४१-२३२३८४४, धुळे- ०२५६२-२८८०६६, नंदुरबार - ०२५६४-२१०००६, जळगाव - ०२५७-२२१७१९३/२२२३१८०, पुणे - ०२०-२६१२३३७१, सोलापूर - ०२१७-२७३१०१२, कोल्हापूर - ०२३१-२६५२९५४, सांगली - ०२३३-२६००५००, सातारा- ०२१६२-२३२३४९/२३२१७५, छत्रपती संभाजीनगर- ०२४०-२३३१०७७, धाराशिव- ०२४७२-२२७३०१, हिंगोली - ०२४५६-२२२५६०, परभणी - ०२४५२-२२६४००, बीड- ०२४४२-२९९२९९, नांदेड - ०२४६२-२३५०७७, जालना- ०२४८२-२२३१३२, लातूर- ०२३८२-२२०२०४, अमरावती- ०७२१-२६६२०२५, यवतमाळ - ०७२३२-२४०७२०, वाशिम- ०७२५२-२३४२३८, अकोला- ०७२४-२४२४४४४, बुलढाणा- ०७२६२-२४२६८३, नागपूर - ०७१२-२५६२६६८, वर्धा- ०७१५२-२४३४४६/२९९०१०, चंद्रपूर - ०७१७२-२७२४८०/२५००७७, गोंदिया - ०७१८२-२३०१९६, भंडारा- ०७१८४- २५१२२२, गडचिरोली- ०७१३२- २२२०३१/२२२०३५

महानगरपालिका नियंत्रण कक्ष क्रमांक

बृहन्मुंबई - ०२२-२२६९४७२५/२७, २२७०४४०३/१९१६/९८३३८०६४०९, ठाणे - ०२२-२५३७१०१०/८६५७८८७१०१/ ०२/ ७५०६९४६१५५, नवीमुंबई- ०२२-२७५६७२८१, भिवंडी - ०२५२२-२५००४९/२३२३९८, कल्याण - ०२५१-२२११३७३, मीरा भाईंदर- ०२२-२८१९२८२८/२८११७१०२, उल्हासनगर - ०२५१-२७२०१४९/२७२०१४३, वसई-विरार - ०२५०-२३३४५४७, पनवेल - ०२२-२७४५८०४०, नाशिक - ०२५३-२५७१८७२/२३१७५०५, मालेगाव - ०२५५४- २३४५६७, अहिल्यानगर- ०२४१- २३२९५८१/०२४१- २३२३३७०, धुळे- ०२५६२-२८८३२०, जळगाव - ०२५७-२२३७६६६, पुणे- ०२०-२५५०६८००/१/२/३, पिंपरी-चिंचवड - ०२०-६७३३११११, सोलापूर - ०२१७-२७४०३३५, कोल्हापूर- ०२३१-२५३७२२१, सांगली-मिरज-कुपवाड - ०२३३-२९५०१६१, छत्रपती संभाजीनगर - ०२४०-१५५३०४, परभणी - ०२४५२-२२३१०१, नांदेड- ०२४६२-२३४४६१, लातूर- ०२३८२-२४६०७७/२४६०७५, अमरावती - ०७२१-२५७६४२६, अकोला - ०७२४-२४३४४६०, नागपूर - ०७१२-२५५१८६६/७०३०९७२२००, चंद्रपूर - ९८२३१०७१०१ / ८९७५९९४२७७, ०७१७२-२५९४०६/२५४६१४

रेल्वे नियंत्रण कक्ष समन्वय अधिकारी

कोकण रेल्वे- बेलापूर हेड क्वाटर कंट्रोल रूम- ९००४४४७१९९

पश्चिम रेल्वे- डेप्युटी पंक्च्युयालिटी - ९००४४९९०९९

मध्य रेल्वे- सेफ्टी काऊंसिलर आपत्ती व्यवस्थापन- ८८२८११००५०

## कृषी मंत्री अॅड. माणिकराव कोकाटे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : अॅड. माणिकराव कोकाटे कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य हे दि.२५ मे २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे.

रविवार दि.२५ मे २०२५ रोजी पुणे येथून मोटारीने दुपारी ०२.३० वा. पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरा कडे प्रयाण व दर्शनास उपस्थिती. दुपारी ०३.३० वा. पंढरपूर येथून अरण ता. माढा कडे प्रयाण. ०४.०० वा. अरण येथे आगमन घाडगे फार्म पाहाणी व राखीव. ०४.३० वा अरण येथून मोटारीने शेलगाव-वांगी ता. करमाळा कडे प्रयाण . सायं. ०५.३० वा शेलगांव-वांगी येथे आगमन व तालुका फळरोपवाटीका, जेऊर व केळी संशोधन केंद्र शेलगाव येथे भेट व राखीव. सायं. ०६.०० शेलगाव वांगी ता. करमाळा येथून कंदर ता. करमाळा कडे प्रयाण. सायं. ०६.३० कंदर ता.



करमाळा येथे आगमन व किरण डोके , फळांचे पुरवठादार यांचे पॅक हाऊस व कोल्ड स्टोरेज प्री कुलिंग पहाणी व राखीव .सायं. ०७.३० वा. कंदर येथून भीमानगर ता. माढा कडे प्रयाण. रात्री ०८.०० वा उजनी , शासकीय विश्रामगृह , भीमानगर, ता. माढा येथे आगमन व मुक्काम करतील.

# आपला थक्क करणारा इतिहास मुलांना समजण्यासाठी बालसाहित्याची निर्मिती व्हावी : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आपला थक्क करणारा इतिहास मुलांना समजण्याच्या दृष्टीकोनातून बालसाहित्याची निर्मिती झाली पाहिजे, असे मत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. 'पुणे बाल पुस्तक जत्रा' सारख्या उपक्रमातून साहित्याचे संस्कार, ज्ञान आणि ज्ञानाची परंपरा आणि त्याचा अभिमान निर्माण होऊ शकतो, असेही ते म्हणाले. राष्ट्रीय पुस्तक न्यास, पुणे महानगर पालिका, पुणे पुस्तक महोत्सव संवाद यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित 'पुणे बाल पुस्तक जत्रा २०२५' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक तथा पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्ण कुमार गोयल, बुलढाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, लेखक ल. म. कडू,





लेखिका संगीता बर्वे, साहित्यिक राजीव तांबे, संवाद संस्थेचे संस्थापक संचालक सुनील महाजन, प्रसेनजीत फडणवीस आदी उपस्थित होते.

चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, आपला थक्क करणारा इतिहास नीट मांडला गेला नसल्याने आपल्या मनात न्यूनगंड निर्माण झाला. लहान मुलांची ग्रहण करण्याची क्षमता मोठी असल्याने हा इतिहास पोहोचवण्याचे मोठे माध्यम लहान मुले आहेत. जगातील पहिला शब्दकोश भारतात निर्माण झाला, पहिली शस्त्रक्रिया भारतात झाली, पहिले विद्यापीठ आपल्या इथे झाले. हे मुलांना समजले पाहिजे यासाठी छोट्या छोट्या पुस्तकांची निर्मिती झाली पाहिजे.

भारतीय खेळ हे मुलांना जास्त निरोगी बनवत होते, जास्त एकाग्रता निर्माण करतात. कोल्हापूर येथे खेळघर संकल्पना राबविली जात आहे. खेळाच्या माध्यमातून बुद्धीचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो आणि वाचायची सवय लावतो. हा उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मंत्री श्री. पाटील यांनी श्री. पांडे यांचे अभिनंदन केले.

### बाल पुस्तक जत्रा राज्यभरात जिल्हास्तरावर व्हाव्यात : मंत्री उदय सामंत

बाल पुस्तक जत्रा राज्यभरात जिल्हास्तरावर व्हाव्यात- उदय सामंत

उदय सामंत म्हणाले, पुस्तकांची जत्रा हा अतिशय नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. जे साहित्य निर्माण होते त्याच्या मागे शासन उभे करण्याची जबाबदारी आमची आहे. परंतु, पुस्तक महोत्सव भरविण्यासाठी पुणे शहराच्या बाहेरही पडले पाहिजे. अशा महोत्सवातून बाल पुस्तकांची चळवळ उभी राहील अशी आशा आहे. पुण्याला मराठीचा वारसा, सांस्कृतिक वारसा, शिक्षणाची पंढरी असून येथे जे काही मराठी भाषेत निर्माण होते त्याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत असतात. त्यामुळे अशा बाल पुस्तकाच्या जत्रा जिल्हास्तरीय झाल्या पाहिजेत, यासाठी पुढाकार घेण्यात येईल. त्याचे संयोजन आणि नियोजनाची जबाबदारी पुणे पुस्तक महोत्सवाने घ्यावी, अशी अपेक्षा श्री. सामंत यांनी व्यक्त केली.

माधुरी मिसाळ म्हणाल्या, पुणे हे शहर वाचनसंस्कृती आणि खाद्यसंस्कृती असलेले आहे. या जत्रेमध्ये येथे बालकांसाठी खेळ येथे पाहायला मिळाले. खेळांमुळे एकाग्रता वाढते, शारीरिक क्षमता वाढतात. आम्हाला आई वडिलांनी पुस्तकांची खूप आवड लावली. पुण्यात पुस्तकांना उत्स्फूर्त प्रतिसाद आहे. वाचन संस्कृती कितीही पुढे गेली आणि आज लॅपटॉप, संगणक आदींवर पुस्तके वाचायला मिळत असली तरी पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा, पुस्तकाचा स्पर्श हाताला होऊन ते वाचणे याच्यामध्ये खूप वेगळी मजा आहे, असे सांगून हा उपक्रम राबविल्याबद्दल श्रीमती मिसाळ यांनी श्री. पांडे यांचे अभिनंदन केले.

मिलिंद मराठे म्हणाले, येणाऱ्या काळात पुण्याच्या पुस्तक महोत्सवाच्या यशस्वीततेनंतर नागपूर आणि मुंबई येथे पुस्तक महोत्सव भरविण्यात येणार आहे. राष्ट्रीय पुस्तक न्यासामार्फत ग्रंथालयांचे जाळे (नेटवर्किंग ऑफ लायब्ररीज) निर्माण करणे आणि समुदाय ग्रंथालयांची सुरूवात (इनिशिएशन ऑफ कम्युनिटी लायब्ररीज) याचा एक कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे. संपूर्ण देशभरात कम्युनिटी लायब्ररीचे जाळे निर्माण करून त्यातून वाचन संस्कृती वाढावी असा प्रयत्न यातून होणार असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविकात राजेश पांडे म्हणाले, आजकाल वचन कमी झाले आहे असे म्हटले जाते. मात्र, पुणे पुस्तक महोत्सवाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. यातून पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या साहित्य जगताला, प्रकाशक जगताला अतिशय ऊर्जा मिळाली. दिल्लीतील राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या जागतिक पुस्तक प्रदर्शनाला मुलांचा प्रतिसाद पाहता पुण्यातही असा उपक्रम राबविण्याची संकल्पना समोर आली. त्यामुळे हा उपक्रम राबविण्यात येत असून कदाचित भारतातील पहिलाच असा बाल जत्रेचा उपक्रम असेल, असेही ते म्हणाले.

प्रारंभी मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉलला भेटी देऊन पाहणी करून स्टॉलधारकांशी संवाद साधला. मुलांचे खेळ पाहतानाच स्वतः त्यांनी विटी-दांडू हाती घेऊन खेळाचा थोडा आनंद घेतला. राज्यमंत्री मिसाळ यांनी लगोरी खेळाचा आनंद लुटला.

यावेळी पालक, लहान मुले मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. पुस्तके हातात घेताना होणारा आनंद बालकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. खेळांचा आनंदही त्यांनी मनमुराद लुटला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दगडाने मारहाण करून सरकारी कामात अडथळा

सोलापूर, (प्रतिनिधी) : दगडाने मारहाण करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी १५ जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २१ मे रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास जुना पुना नाक्याकडून शिवाजी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील हॉटेल म्बेसिडर समोर घडली. याप्रकरणी अंबादास शेखू तळभंडारे (वय-५५नोकरी सोलापूर महानगरपालिका कोंडवाडा विभाग,राहणार शेटे नगर,लक्ष्मी पेठ,दमानी नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मोजम शेख,सादिक शेख,जब्बार हाजीसाब लोखंडवाले, हानीफ कुरेशी,आबरार रंगरेज,बिलाल कुरेशी,जैद कुरेशी, नक्टा बाबू व बाबा यांच्यासह सहा ते सात अनोळखी इसमानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की,मोकाट गुरे वाहन क्रमांक एम.एच.१३. डी.क्यू.८८७३ यामध्ये लहान मोठे गायी, कालवड असे एकूण सहा जनावरे गो शाळेत जमा करण्यासाठी घेऊन जात असताना वरील संशयित आरोपी यांनी खाजगी दोन चाकीवर येऊन फिर्यादी व चालक दोघांना शिवीगाळ करून दमदाटी करत दगडाने मारहाण केली.तसेच वाहनाची चावी काढून घेण्याचा प्रयत्न करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने बॅटरी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) सोलापूर मनपा विभाग क्रमांक १ येथे दुचाकी क्रमांक एमएच.१३.ए एक्स.२४०६ या वाहनावरील सहा हजार रुपये किमतीची बॅटरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ ते २२ मे दरम्यान घडली.याप्रकरणी प्रसाद विजयकुमार देवरमणी (वय-३३,रा.नितीन नगर, अक्कलकोट रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबर हे करीत आहेत.

# सहकारी शिरोमणीची फसवणूक केल्याप्रकरणी वाहन मालकास अटक

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल; नुकसान व फसवणूकीमुळे फिर्याद दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ऊस तोडणी करून वाहनाद्वारे ऊस पुरवठा करण्याची करार करून, प्रत्येकी पाच लाख रुपये प्रमाणे पंधरा लाख रुपये उचल घेऊन संबंधित यंत्रणा न पुरविता( चंद्रभान नगर) भाळवणी येथील सहकारी शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची नुकसान व फसवणूक केल्याप्रकरणी तीन जनाविरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील दुसरा आरोपी याला मेडंद तालुका माळशिरस येथून अटक करण्यात आली होती. सदर आरोपीस दि.२१/०५/२०२५ ते दि.२२/०५/२०२५ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. दि.२२/०५/२०२५ न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन

**गेले पंचवीस वर्षात सहकार शिरोमणीने कधीही ऊस मालकाचे वाहतूकदारांना कोणतीही तक्रार केलेली नाही. उलट ज्यांच्या टोळ्या पळून गेल्या. उलट कारखान्याने त्यांना सर्व कायदेशीर मदत केली. येणार खर्च ही भरला. ज्या कारखान्याकडे करार करून पैसे उचललेले असतात. त्याच कारखान्यात ऊस पुरवठा करणे अपेक्षित असते. परंतु गत हंगामात काही जणांनी सहकार शिरोमणी कडे करार करून अन्य कारखान्यांना ऊस पुरवठा केला. त्यामुळे कारखान्याची नुकसान आणि फसवणूक झाली आहे म्हणून पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करावी लागली त्या अनुषंगाने पोलीस खात्यांनी आरोपीस अटक केली त्यामुळे तोडणी वाहतूक ठेकेदारांच्या मध्ये वचक बसेल अशी अपेक्षा आहे.**

कोठडीत रवानगी झाली आहे.

देविदास विठ्ठल तरडे, राणी देविदास तरडे,( राहणार बजरंग वस्ती) कचरेवाडी तालुका माळशिरस व यशवंत बाळासाहेब लवटे रा. मेदंड तालुका माळशिरस अशी गुन्हा दाखल झालेले तिघांची नावे आहेत. सन २०२४/ २०२५ या ऊस गळीत हंगामात सहकार शिरोमणी साखर कारखान्यासाठी मुजरांमार्फत ऊस तोडणी करून वाराद्वारे पुरवठा करण्याचा करार यातील तिघांनी केलेला होता. त्या पोटी कारखान्याने त्यांना प्रत्येकी पाच लाख




रुपये प्रमाणे १५ लाख रुपये निशिगंधा सहकारी बँकेतून अदा केले होते.

गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर यातील तिन्ही वाहन मालक कारखान्याकडे यंत्रणेसह हजर झाली नाही सहकार शिरोमणी करार करून पैसे घेऊन ते अन्य कारखान्याकडे ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा गेल्याचे निदर्शनास आले. कारखान्याची नुकसान व फसवणूक केल्याप्रकरणी फिर्याद शेती अधिकारी प्रतापराव थोरात यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल केली. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर तिन्ही ठेकेदार पसार झाले होते. दुसरा आरोपी यशवंत बाळासाहेब लवटे(रा. वेदंड तालुका माळशिरस) यांना पोलिसांनी अटक केली आहे त्याच गुरुवार दिनांक२२/०५/२०२५ रोजी न्यायालयात हजर करण्यात आली आस्था त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. कारखान्याच्या वतीने अँड बी. व्ही. भादुले यांनी काम पाहिले सदर गुन्ह्याचा तपास ग्रामीण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हुंबे, व राऊत पुढील तपास करीत आहे.

## नारायण चिंचोली विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी विष्णू माने, व्हा. चेअरमनपदी श्रीधर कोळेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक दिनांक १९ मे २०२५ रोजी पार पडली चेअरमन पदी

विष्णू मच्छिंद्र माने चेअरमन पदी श्रीधर तुकाराम कोळेकर यांच बिनविरोध निवड करण्यात आली.

माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा पांडुरंग कारखान्याची संचालक लक्ष्मणराव धनवडे यांनी सोसायटीची निवडणूक बिनविरोध केली व या निवडीवेळी चेअरमन वाय चेअरमन विष्णू माने व्हाईट चेअरमन श्रीधर कोळेकर यांचे एकमेव अर्ज असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी चेअरमन पदी विष्णू माने मध्ये श्रीधर कोळेकर यांची निवड झाल्याचे घोषित करण्यात आले यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वाय एस म ुरडे जे एल जमादार यांनी काम पाहिले यावेळी सोसायटीची माजी सचिव माळी व शिंगटे उपस्थित होते.

निवडीच्या वेळी माजी सरपंच धर्मराज नलावडे माजी सरपंच विठ्ठल माने सूर्यनारायण देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दत्तात्रेय मस्के स्विमिंग हीमिरे माजी सरपंच बळवंत धनवडे माजी चेअरमन ज्ञानेश्वर बडे नारायण गुंड सदस्य प✻✻✻ पाटील भास्कर गुंड शिवाजी वसेकर ज्ञानेश्वर मस्के तुकाराम कोल्हे मुकुंद गाडगे सुदामती गोरख मस्के हेमा ताई धर्मराज नलवडे

ललिता भास्कर गुंड मंगल अंबादास गाजरे आधी मान्यवर उपस्थित होते व निवडीनंतर माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते नूतन चेअरमन व्हा चेअरमन चा सत्कार करण्यात आला

## अनु. जाती व अनु जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी विविध घटकांच्या लाभासाठी अर्ज करावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर जिल्ह्यातील अनु. जाती व अनु जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यास रक्कम रु.६८७.८६ लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली आहे. सदर योजनेंतर्गत घटक ड्रॅगन फ्रूट, ॲव्होकॅडो, सुटटी फुले, मसाला पिक, मानांकन रोपवाटीका स्थापन करणे, स्ट्रॅाबेरी, हरितगृह, शेडनेट हाऊस, प्लास्टिक मल्चिंग, मधुमक्षिक वसाहत, ट्रॅक्टर पावर टिलर ८ एचपी पेक्षा जास्त, फार्मगेट पॅक हाऊस, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी, कांदाचाळ, सामुहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण इत्यादी तसेच औषधी व सुगंधी वनस्पती लागवड अंतर्गत घटकांचा समावेश आहे.

लाभार्थी निवडीचे निकष:- लाभार्थी शेतकऱ्यांच्या नावे स्वतःची शेत जमिन असणे आवश्यक आहे. शेतकरीकडे फलोत्पादन (फळे, भाजीपाला, फुले व इतर इ.) पिके असणे आवश्यक आहे. तरी जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की,सदर घटकांचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेल. अधिक माहितीसाठी संबंधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## प्रहार जनशक्ती पक्षाकडून समाधान बागल यांना छत्रपती शिवाजी महाराज राजकीय धुरंदर पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी आपल्या पक्षातील निष्ठावंत व असामान्य काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विभाग स्तरावरील प्रथम क्रमांकाचा छत्रपती शिवाजी महाराज राजकीय धुरंदर पुरस्कार देण्यात आला. बच्चू कडूंनी आपल्या कार्यकर्त्यांना त्यांच्या असामान्य कामासाठी संताजी धनाजी पुरस्कार जाहीर करण्याचा मानस ठेवला व त्या पुरस्काराचे वितरण २२ मे रोजी करण्यात आले या पुरस्कारामध्ये पक्षासाठी व समाजासाठी असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्तीला संताजी धनाजी कार्यकर्ता पुरस्कार अभियान मार्फत व




छत्रपती शिवाजी महाराज राजकीय धुरंदर पुरस्कार देण्यात आला या पुरस्कारासाठी नाशिक विभागातून समाधान बागल यांना सर्व कार्याची दखल घेऊन पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी पक्षाकडून दिला जाणारा अतिशय प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला या पुरस्कारा नंतर समाधान बागल यांनी आपल्याला पक्षासाठी आणखीनच कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळाली त्याचप्रमाणे यानंतर परत एकदा डबल ताकतीने कामाला लागू व याहूनही सुंदर काम करून दाखवू समाजासाठी पक्षासाठी व राष्ट्रासाठी या पुरस्कारानंतर पूर्णपणे झोकुन देऊन काम करण्याबद्दल सुतोवाच समाधान बागल यांनी केले समाधान यांनी हिंदु धर्म रक्षक मातोश्री पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव सोहळा समिती नाशिक या समितीचे ते संस्थापक अध्यक्ष असून. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे परिसरातून अभिनंदन केले जात आहे

## वृद्ध महिलेची आजारपणास कंटाळून रेल्वे खाली आत्महत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील पिंपळस रामाचे येथील भिमाबाई नामदेव वाघ ८० या वृद्ध महिलेने स्वतःच्या आजारपणास कंटाळून सुनार पुलाच्या वरती रेल्वे रुळावर आत्महत्या केली.

सविस्तर वृत्त असे की भिमाबाई वाघ दिनांक १९/५/ २०२५ रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास घरात कोणास काही एक न सांगता निघून गेल्या व भाऊसाहेब नगर परिसरातील सुनार मोरी रेल्वे रुळावर स्वतःच्या आजारपणास कंटाळून रेल्वेखाली आत्महत्या केली. या घटनेची



नोंद निफाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार बी एन वाळेकर हे करीत आहे.

**तहसीलदार जीवन बनसोडे यांचे प्रतिपादन**

**लामजेवाडी येथील लोकशाही दिनाला ग्रामस्थांचा प्रतिसाद**

# लोकशाही दिन हे प्रशासन आणि नागरिकांमधील दरी कमी करण्याचे माध्यम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर : अतुल सोनकांबळे :: लोकशाही दिवस हे प्रशासन आणि नागरिकांमधील संवाद वाढवण्यासाठी आणि दरी कमी करण्यासाठी एक महत्त्वाचे माध्यम आहे. या दिवशी नागरिकांच्या समस्या, तक्रारी आणि सूचना थेट प्रशासनाकडे मांडता येतात, ज्यामुळे प्रशासनाला लोकांच्या गरजा आणि अपेक्षांची जाणीव होते आणि त्यानुसार कार्यवाही करता येते. तसेच शेतकरी आणि नागरिकांची छोटी छोटी कामे तालुक्याऐवजी गावातच मार्गी लागण्यास मदत होते, असे प्रतिपादन इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी केले.

लामजेवाडी ( ता.इंदापूर) येथे बुधवारी (दि.२१) आयोजित

### शेटफळगढे ग्रामपंचायतीचे कौतुक

**इंदापूर तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या व सुमारे ५० किलोमीटर अंतर असलेल्या लामजेवाडी गावात लोकशाही दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी दोन महिन्यांपासून पाठपुराव करणाऱ्या पत्रकार गोविंद बर्गे, सामाजिक कार्यकर्ते गोपाळ धुमाळ माजी सरपंच राहूल वाबळे यांचे तहसीलदार बनसोडे यांनी कौतुक केले. तसेच कार्यक्रमासाठी अतिशय नेटके नियोजन केल्याबद्दल शेटफळगढे ग्रामपंचायतीचे देखील कौतुक करीत कार्यक्रमाला मिळालेल्या चांगला प्रतिसादाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.**

लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, विजय खुगे, पुरवठा निरीश्रक सपन गुड्डमवार, गटविकास अधिकारी सचिन खुडे, सहायक निबंधक संध्या कदम, सहायक पोलिस निरीक्षक विनोद महांगुडे,पंचायत समितीचे अमोल मेरगळ, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल कारंडे, मंडल अधिकारी दीपक कोकरे, कृषी मंडल अधिकारी किसन पिसाळ, तलाठी अशोक कदम, सागर पवार, ग्रामविकास अधिकारी नागनाथ गर्जे, श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका माधुरी



राजपुरे, सरपंच शंकर राऊत, इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती म हनुमंतराव वाबळे, माजी संचालक संतोष वाबळे, माजी सरपंच शितल धुमाळ, राहुल वाबळे, ज्ञानेश्वर वाबळे, ग्रामपंचायत सदस्य माऊली भोसले, माजी उपसरपंच सोमनाथ सवाणे तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष पोपटराव राजपुरे आदी उपस्थित होते.



या लोकशाही दिनाला परिसराला ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी पुरवठा विभागाचे ६९ अर्ज, रस्त्यांच्या अडचणींबाबतचे १६, महसूलसंबंधीत १६५, उत्पन्न दाखला १७ आणि रहिवाशी दाखला ६ अर्ज असे एकूण २६८ अर्ज प्राप्त झाले. तसेच या वेळी १० विद्यार्थ्यांना तहसीलदार बनसोडे यांच्या हस्ते उत्पन्न व रहिवाशी दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तहसीलदार बनसोडे आणि गटविकास अधिकारी खुडे यांनी ग्रामस्थांना विविध शासकीय योजनांची माहिती सांगून त्याचे लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते गोपाळ धुमाळ, माजी सरपंच राहूल वाबळे, कालीचरण भोईटे, महादेव सुर्यवंशी, गणेश बर्गे, रमेश बर्गे, प्रविण धुमाळ, गजानन घाडगे, तुषार बर्गे, शरद निगडे, पंढरीनाथ कदम, अक्षय कदम, प्रदीप ताटे यांनी परीश्रम घेतले. प्रास्ताविक गोपाळ धुमाळ यांनी केले. आभार महादेव सुर्यवंशी यांनी मानले.

## थोडक्यात...




### तरुणाच्या खिशातून मोबाईल लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) भाजी खरेदी करण्यासाठी गेल्यानंतर फिर्यादी तरबेज नीरज पठाण (वय-२१,रा. विजय लक्ष्मी नगर, नई जिंदगी) यांच्या खिशातील ४० हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मार्केट यार्ड येथे घडली.याप्रकरणी तरबेज पठाण यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल धुमाळ हे करीत आहेत.

### रेल्वे स्टेशन परिसरातून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : रेल्वे स्टेशन परिसरात पार्क करून ठेवलेले दुचाकी क्रमांक एमएच.१३.सी.वाय.२७६१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २० मे रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी माऊली प्रकाश जाधव (वय-३२,रा.मुक्काम पोस्ट तेलगाव) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने कार्यालयातून तीन लाखांचे साहित्य पळवले

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात चोरट्याने कार्यालयात प्रवेश करून तीन लाखाचे साहित्य चोरून नेल्याची घटना २० ते २१ मे दरम्यान कुमठे रोड येथे घडली.याप्रकरणी अनिल हणमंतू कोळी (वय-३१,रा.गणेश नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांच्या कुमठे येथे असलेल्या कार्यालयाच्या आत उघड्या खिडकीतून प्रवेश करून अज्ञात चोरट्याने ३ लाख १ हजार रुपये किमतीचे काळ्या रंगाची स्लरी पंप, दोन नग १० एचपी पंप, १ एच.पी पंप, ५ नग हावेल्स कंपनीचे पंप, १ एचपी.पंप, २ कॉपर प्लेट व नट बोल्ट असे साहित्य चोरून नेले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# 'एक राज्य एक दस्त' योजनेत शेतकऱ्यांची फसवणुकीची शक्यता

## अखिल भारतीय मराठा महासंघ व सहयोगी संघटना संस्था यांच्या वतीने मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : एक राज्य एक दस्त या योजनेत शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता असल्याचे जमीन विकसन विक्री आणि जमीन खरेदी विक्री दरात नोंदणी दोन बाबी वगळण्यात याव्यात अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघ व सहयोगी संघटना संस्था यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.


मराठा महासंघामध्ये जिल्हाध्यक्ष राजूराव चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की राज्यातील एका ठिकाणचा दस्त अन्य कोणत्याही जिल्ह्यात नोंदविता येण्यासाठी नोंदणी व मुद्रक शुल्क विभागाचा एक राज्य एक दस्त हा उपक्रम सध्या प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर आणि उपनगर या दोन जिल्ह्यात सुरू आहे कोणत्याही जिल्ह्यातील दस्तक कोणत्याही जिल्ह्यात नोंदविता येणार आहे. ३० एप्रिल रोजी याचे आदेश सूचना जारी केली होती. राज्यातील दुय्यक निबंधक नजीकच्या गावातील दस्त नोंदणी होत असते. ग्रामीण भागात दुय्यक निबंध कार्यालय आहेत.

नोनी विभागाच्या सूचनेनुसार अमरावती विभागात ६२ छत्रपती संभाजी नगर विभागात ३४, ५२ मुंबई विभागात २४ ,नागपूर विभागात ७१, नाशिक विभाग ७५, पुणे विभाग ११०, ठाणे विभाग ७६, एकूण ५०४ दस्त नोंदणी कार्यालय आहेत. एक राज्य एक दस्त या दस्तकामुळे शेतकरी जी फसवणूक व गैरकारभार होण्याची शक्यता आहे. सध्या राज्यात एक कोटी दहाव्याची प्रलंबित आहेत.

या उपक्रमामुळे ५० लाख दाव्याची अधिक भर पडेल असे मराठा महासंघाचे म्हणणे आहे एका टोकाचा व्यवहार दुसऱ्या टोकाच्या नोंदणीला दस्तक दुसऱ्या नोंदणी करणे येणार आहे दस्तक नोंदणीत फसवणूक झाल्यास ग्रह खात्याच्या नियमानुसार नोंद झालेले ठिकाणी गुन्हा दाखल करावा लागणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांना फरपट करावी लागणार आहे. दस्त नोंदणी मध्ये मृत व्यक्ती च्या ठिकाणी दुसरी व्यक्ती उभा करणे व त्याची खरेदी करणे अशा प्रकारचे डोंगरी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी खरेदी करणे एका भावाच्या त्यांचे इसे नसताना त्याची खरेदी करणे इसे विकणे सामायिक इमारतीच्या एकादशी दराचे लीड करणे, रेरा नोंदणी नसणाऱ्या बेकायदेशीर बांधकामाची प्लॉट व प्लॉट विक्री करणे व सातबारावर इतर हातात नावे असताना दस्त नोंदणी होणे व देवस्थानच्या जमिनी गुरवांच्या नावावर असताना मूल्यांकन असताना वाटप करणे. आधी व्यवहार होऊ शकतात. हा कायदा रद्द करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, उपाध्यक्ष सचिन गांथडे, जिल्हा सचिव गुरुदास गुटाळ, युवक जिल्हाध्यक्ष शिवाजी मोरे, विद्यार्थी बिघाडी अध्यक्ष हनुमंत कदम, माजी जिल्हाध्यक्ष सचिन गायकवाड, शहराध्यक्ष अमोल पवार, सोलापूर शहराध्यक्ष अजिंक्य शिंदे, हॅन्ड अमोल बोडके काका गायकवाड, सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिपाइं चिंचोळी शाखाध्यक्षपदी बसवराज सोनकांबळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (तालुका प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्यातील चिंचोळी(मैं) चे शाखाध्यक्षपदी बसवराज हणमंत सोनकांबळे यांची निवड ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे.

ही निवड रिपाइं(आठवले गट) महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या आदेशानुसार रिपाइं(आठवले गट) अक्कलकोट तालुका अध्यक्ष मा.अविनाश माडीखांबे यांनी केली आहे. व या प्रसंगी रिपाइं(आठवले गट)चे पुणे शहर उपाध्यक्ष मा.राम सोनकांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली आहे.

रिपाइं चिंचोळी शाखा अध्यक्ष पदी बसवराज सोनकांबळे यांची निवड करण्यात आल्यांने त्यांच्या निवड झाल्याने पक्षाचे काम एक निष्ठेने करुन पक्ष वाढीस व त्यांच्या भावी राजकीय,सामाजीक कार्यास पुणे शहर अध्यक्ष राम सोनकांबळे,सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे व दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी यांनी हार्दिक शुभेच्छा देण्यात आली आहे.

# जाब विचारल्याच्या कारणावरून मारहाण; तीन जणांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) जाब विचारण्याच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संजय यल्लाप्पा साठे (वय-४६,रा.न्यू पाच्छा पेठ, अण्णाभाऊ साठे नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पवन क्षिरसागर,सावन क्षिरसागर,आदित्य दुबे (सर्व राहणार न्यू पाच्छा पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांच्या राहत्या घराजवळ वरील संशयित आरोपी यांनी नेहमी फिर्यादीच्या घराबाहेर उभे राहता याच्या जाब विचारला असता वरील संशयित आरोपींनी चिडून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली. तसेच सावन क्षिरसागर याने फिर्यादी यांच्या तोंडावर मारून दात पाडून जखमी केले.दरम्यान फिर्यादी यांना वाचवण्यासाठी आलेली त्यांची पत्नी यांना देखील व मारहाण करून फिर्यादीचा मुलाला मारून जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोसई. बनकर हे करीत आहेत.

# कार्यकर्त्यांसाठी म्हेत्रेंचा निर्णय योग्य : दसाडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट, प्रतिनिधी : अक्कलकोट : माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शिंदे गटाच्या शिवसेने मध्ये जाण्याचा निर्णय योग्य असून गेल्या सहा सात वर्षांपासून कार्यकर्त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून त्यांचे संघर्ष बघत बसण्या पेक्षा कार्यकर्त्यांच्या पाठीशी कायम राहण्यासाठी गेल्या सात आठ महिन्यांपासून कार्यकर्ते आमच्यासाठी काही तरी निर्णय घ्या अशी मागणी होते त्या मागणी प्रमाणे म्हेत्रे साहेबांनी घेतलेले निर्णय योग्य असून कार्यकर्तेना बळ देण्यासाठी तालुक्यातील व विकास कामांना गती देण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला आहे याचे आम्ही सर्व कार्यकर्ते स्वागत करतो असे दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिति संचालक इराणा दसाडे म्हणाले

पुढे बोलताना सांगितले. कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे म्हेत्रे यांनी हा निर्णय घेतला आहे असेही दसाडे म्हणाले. वरिष्ठांकडून म्हेत्रे यांना बळ मिळत नव्हते यामुळे कार्यकर्ते नाराज होते, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील तोंडावर आहेत. त्यामुळे कॉंग्रेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

# पिंपळास येथील वन जमिनीवर थाटले गॅरेज व सर्विसिंग सेंटर; वन विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे /प्रतिनिधी

भिवंडी तालुक्यातील मौजे पिंपळास ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं. ३९/१ या जमिनीस लागून असलेल्या ३ ते ४ गुंठे वन जमिनीत उद्योजक समीर मेहता यांनी अतिरिक्त व अनधिकृत वॉल कंपाउंड बांधकाम व कॉंक्रेटीकरण करून या कंपाउंड मध्ये एच. एम. एस. इंटरनॅशनल या नावाने गॅरेज व सर्विस सेंटरचा व्यवसाय सुरु केला असुन वनविभागाचे काही अधिकारी यांचा वरदहस्त असल्याने वन जमिनीत सर्विस सेंटर व अनधिकृत बांधकाम असून हे सर्विस सेंटर व अनधिकृत बांधकाम त्वरित हटविण्यात यावे अशी मागणी वनहक्क व्यवस्थापन समितीने केली आहे तसेच वन विभागाने यात हलगर्जीपणा केल्यास आंदोलनाचा इशाराही समितीच्या वतीने दिला आहे.

वनहक्क व्यवस्थापन समितीने वनविभागाला दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की समीर मेहता यांनी बांधलेल्या वनविभागातील जमिनी मधे गॅरेज व सर्विस सेंटर मध्ये पोकळण, जेसीबी, रोलर, हायड्रा ,फोरक्लिप यांची सर्विसिंग,रिपेरिंग केली जाते व विक्री देखील केली जाते , याकडे वन विभागाने सर्रासपणे दुर्लक्ष केले असुन यात वन विभागाचा देखील हात असल्याचा वनहक्क व्यवस्थापन समितीने आरोप केला आहे. आमच्य गावातील जमिनी हे बाहेरील उद्योजक बळकवतात व त्यावर अनधिकृत बांधकाम करून व्यवसाय थाटतात, समीर मेहताने सदरील जमिनीवर कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम करून अनेक वर्ष झाले आहेंत, परंतु यावर वन विभाग दुर्लक्ष करत असुन कोणी तक्रार दिली की त्यावर फक्त थातूर मातुर कारवाई केली जाते व चिरीमिरी घेऊन पुन्हा दुर्लक्ष केले जाते, गावातील काही रस्ते, घरे किंवा इतर बांधकाम गांववाल्यांच्या कबज्यात येत असेल किंवा या जमिनी उदरनिर्वाह साठी कब्जात असतील तर त्यांच्यावर उघड कारवाई केली जाते, मग बाहेरील उद्योजक समीर मेहता यांनी पिंपळास ते नाशिक महामार्ग या महत्वाच्या पिंपळास गावात जाणाऱ्या रस्त्या लगत ३,४ गुंठयांमध्ये अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम केला आहे यावर वन विभाग मूग गिळून गप्प का आहे ? कारण वारंवार तक्रारी करून देखील वन विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने यात वन विभागाची काही आर्थिक देवाण घेवाण झाली असावी म्हणून समीर मेहतावर वन विभाग मेहरबान आहे असा आरोप वन हक्क समितीने केला आहे.तसेच समीर मेहता यांच्या या वरील वस्तू सतत कंपाउंडमध्ये येत जात असतात त्यामुळे कॉंक्रेटचा रस्ता सतत नादुरुस्त होत असतो तसेच वरील वस्तू व साधन सामुग्री सतत कंपाउंड मध्ये येत जात असल्यामुळे व या वस्तू नेहमी रस्त्यात उभ्या असल्यामुळे आमच्या गावातील नागरिकांच्या वाहनांना जाण्यायेण्यासाठी जागा शिल्लक नसते, त्यामुळे आम्हा गावाकऱ्यांना ये जा करत असताना नेहमीच ट्राफिकचा नाहक त्रास सहन करावा लागतो, तसेच तेथे चढण व उतरण असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे, तेथे कधी अपघात होऊन कोणाचा जीव गेल्यास त्याची जबाबदारी उद्योजक समीर मेहता किंवा वन विभाग घेईल का असा प्रश्न उपस्थित होत आहे, त्यामुळे हे वरील अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम व आतील कॉंक्रेटीकरण तोडण्यात यावे अन्यथा गावातील सर्व ग्रामस्थांना एकत्रित करून जन आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा वनहक्क व्यवस्थापन समिति पिंपळासचे अध्यक्ष सोमवार गणा म्हात्रे यांनी केला आहे. वन हक्क समितीच्या या निवेदनामुळे वनविभागाच्या अतिक्रमणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

### वनहक्क व्यवस्थापन समिती पिंपळास आंदोलनाच्या तयारीत

तहसीलदार जीवन बनसोडे यांचे प्रतिपादन

# महामार्गावरील बाजारास विरोध; नागरिकांकडून पडघा ग्रामपंचायतीच्या कारभाराचा निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा गावाच्या हद्दीतील मुंबई-नाशिक महामार्गालगत भरणाऱ्या आठवडा बाजारास शेरेकर, चिंबीपाडा नागरिकांनी विरोध केला आहे. तसेच, ग्रामपंचायतीच्या कारभारावर शेरेकर, चिंबीपाडा नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

पडघा येथील रविवारच्या आठवडा बाजारासाठी आलेल्या दुकानदारांना गावात जागा मिळत नसल्याने अनेक दुकानदारांनी शेरेकर, चिंबीपाड्याकडे जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गालगत बाजार भरवण्यास सुरुवात केली आहे. यामुळे नागरिकांना महामार्ग ओलांडताना आणि गावात ये-जा करण्यास त्रास होत आहे. याबाबत ग्रामस्थ व ग्राम पंचायत सदस्य महेश वावरे यांनी पडघा ग्रामपंचायत कार्यालयात




लेखी निवेदन दिले, परंतु त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. दरम्यान, याविरोधात सामाजिक संस्थांनी आवाज उठविला. त्याबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध होताच पडघा ग्रामपंचायतीतर्फे कारवाईचे फलक लावून जबाबदारी झटकण्यात आली दरम्यान, कारवाईला न जुमानता आठवडा बाजार रविवारी (१८ मे) पुन्हा त्याच ठिकाणी भरवण्यात आला. तर, खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी

वाहने पार्किंग केल्याचे शेरेकर, चिंबीपाडा येथील तरुणांच्या लक्षात येताच त्यांनी एकत्र येत दुकानदार व वाहनचालकांना जाण्यास सांगितले. यावेळी पडघा ग्रामपंचायतीच्या कारभाराचा निषेध व्यक्त केला. महामार्ग ओलांडताना एखाद्याचा अपघात झाल्यास जबाबदार कोण, असा सवालही त्यांनी यावेळी केला.

# विधवा प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी राज्यस्तरीय जनजागृती राबवा : महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधवा प्रथांचे निमूलन करण्यासाठी मिशन वात्सल्य योजने अंतर्गत जनजागृती करण्यात येते. मात्र काही प्रमाणात अद्यापही अशा कृप्रथा सुरू असल्याचे निदर्शनास आले असून, या प्रथांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये नव तंत्रज्ञानाचा वापर करून विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रबोधन करावे. तसेच अशा प्रथांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी केले.



विधवा प्रथा बंद करण्याच्या ठरावाच्या धर्तीवर राज्यभर केलेल्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात नुकतेच बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सचिव डॉ. अनुपकुमार यादव, महिला व बाल विकास आयुक्त नैना गुंडे, सह सचिव वी. रा. ठाकूर, सह आयुक्त राहुल मोरे उपस्थित होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, विधवा महिलांनाही इतर महिलांप्रमाणे सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. या महिलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याच्या हेतूने या महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मिशन वात्सल्य योजनेच्या माध्यमातून जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

मात्र, आजही काही ठिकाणी विधवा महिलांच्या कपाळावरील कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढली जाणे तसेच विधवा महिलांना समाजातील धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊ न देणे यांसारख्या कृप्रथांचे पालन होताना निदर्शनास येत आहे. यामुळे या महिलांच्या मानवी अधिकारांचे उल्लंघन होत आहे.

या प्रथांना आळा घालण्यासाठी गाव पातळीवर तसेच शहरी भागात वॉर्डस्तरावर समिती गठीत करण्यात आल्या आहेत. या कृप्रथांना पूर्णविराम मिळावा म्हणून समितीच्या माध्यमातून व्यापक प्रमाणावर जनजागृतीपर कार्यक्रम घ्यावेत. नागरिकांना विधवा कृप्रथे संबंधित घटना घडताना आढळल्यास संबंधित तालुका व ग्रामस्तरीय समितीला संपर्क साधण्याचे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले.

या समितीमध्ये ग्रामसेवक, वॉर्ड अधिकारी, तलाठी, प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ग्रामस्तरीय समितींची संख्या ३६ हजार २०५ व जिल्हास्तरीय वॉर्डस्तरीय समितींची संख्या ४९०९ इतकी असून, यामार्फत जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.